क्र.साप्रवि/रवका/न.क्र.२२/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. २३९ दिनांक २० / ०८ / २००९

***विषय*** : मृत कर्मचाऱ्याच्या अवलंबितांस/वयाची ५० वर्षे पूर्ण होण्यापूर्वी वैद्यकीय कारणास्तव, मुदतपुर्व सेवानिवृत्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अवलंबितास सुधारपत्र क्र.२८, दिनांक १६/०४/१९७५ अंतर्गत अनुकंपा तत्त्वावर महावितरण कंपनीत नोकरी देणेबाबत, अर्ज करण्यासाठी ५ वर्षाच्या मुदतीत वाढ करणेबाबत.

***वाचा*** : १) सुधारपत्र क्र.२८ दिनांक १६/०४/१९७५
२) सुधारपत्र क्र. १४६, दिनांक ०६/०८/१९८२.
३) प्रशासकीय परिपत्रक क्र. २३३, दिनांक १९/०९/१९९७.

.....

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ वर्गीकरण व सेवा प्रवेश विनियम १९६१ मध्ये सुधारपत्र क्र.२८, दिनांक १६/०४/१९७५ अन्वये समाविष्ट करण्यात आलेल्या परिशिष्ट 'ज'मधील नियम क्र.५ अंतर्गत मृत कर्मचाऱ्यांच्या/वयाची ५० वर्षे पूर्ण होण्यापुर्वी वैद्यकीय कारणास्तव मुदतपुर्व सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांनी कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर ५ (पाच) वर्षाच्या आत अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळण्यासाठी अर्ज करण्याबाबतची तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि, ५ वर्षाच्या मुदतीपश्चात अशा अवलंबितांकडून क्षमापनेसाठी सक्षम अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येत असलेल्या अर्जांची संख्या विचारात घेऊन सदर नियम क्र.५ मध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. आता व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (प्रकल्प) आणि संचालक (संचलन) यांच्याशी विचारविनिमय करून म.रा.वि.मंडळ वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम १९६१ च्या परिशिष्ट 'ज' मधील नियम क्र.५ खालीलप्रमाणे सुधारित करण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

**नियम क्र.५** : मृत कर्मचाऱ्याच्या अवलंबितास/वयाची ५० वर्षे पूर्ण होण्यापूर्वी वैद्यकीय कारणास्तव मुदतपुर्व सेवानिवृत्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्याच्या विधवेस/विधुरास/मुलीस/मुलास तो/ती शैक्षणिकदृष्टया पात्र असल्यास त्या पदावर तीस/त्यास नियुक्ती देण्याचा विचार केला जाऊ शकेल. मात्र त्यासाठी त्याने/तीने कर्मचाऱ्याच्या मृत्यूच्या तारखेपासून १० (दहा) वर्षाच्या आत अर्ज करणे बंधनकारक राहील. जर मृत कर्मचाऱ्याची मुले त्याच्या मृत्यू समयी सज्ञान नसतील तर अशा प्रकरणी ती सज्ञान झाल्यानंतर १० (दहा) वर्षाच्या आत अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी अर्ज करू शकतील.

**टीप :** **१)** उपरोक्त नमूद केलेल्या कालावधीत कोणत्याही कारणास्तव अवलंबिताकडून अर्ज सादर न झाल्यास त्याचा/तिचा सदर योजनेखाली नोकरी मिळण्याबाबतचा हक्क आपोआप समाप्त होईल.

**२)** वरील नियमावलीसाठी कुटुंब म्हणजे मृत कर्मचाऱ्याची पत्नी / पती / मुले / अविवाहित मुली आणि अवलंबित भाऊ व बहीण.

३. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ वर्गीकरण व सेवा प्रवेश विनियम १९६१ च्या परिशिष्ट 'ज' मधील इतर तरतुदी अबाधित राहतील.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

*( सु.य.पाटील )*
***मुख्य महाव्यवस्थापक (क)***

प्रत :
म.रा.वि.वितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*D:\O&M\Adm.Cir - 22 - C.S.28 doc*